मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया

(मराठी)

अंक ०३ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • मार्च - २०२३



# हसती दुनिया (मराठी)

अंक ०३ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • मार्च - २०२३

**बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)

संपादक
राजेंद्र थोरात
(अवैतनिक)

सजावट व चित्रे
स्वप्निल वि. ऱ्हाटवळ
राजनंदन कृ. पिंपळकर • श्रीकांत द. पाटील

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका संतोष प्रिंटर्स, जय शिवाजी नगर, कात्रक रोड, बेस्ट डेपो, वडाळा, मुंबई- ४०००३१, येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
E-mail : marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही

| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | ₹ 1500 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९







## स्तंभ


- दोन शब्द ०४
- विचारपुष्प १०
- दादाला विचारु या १३
- शब्दकोडे १४
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे १५
- आरोग्याचा मंत्र २४
- दिव्यवाणी २५
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- हसा मुलांनो हसा ३०
- सामान्य ज्ञान ४७
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३८




## विशेष व प्रेरक प्रसंग


- व्यक्तिविशेष ०७
- विशेष - पुरस्कार २३
- भ्रमंती २८
- तेजस्विनी ३२
- विशेष - निबंध ३६
- स्वामी विवेकानंद : प्रेरक प्रसंग ३७
- संतकथा ४२
- विशेष ४३
- मत्स्यपुराण ४८
- विश्वजगत ४९









## कथा


- नंदीची कथा ०५
- अनुभवाचे ज्ञान ०८
- माकडाला अद्दल घडली २०
- नैतिक विकासासाठी २१
- सुखी होण्याची कला ३३
- विश्वास आणि धन्यवाद ४४
- वटवृक्षाची शिकवण ४५





## कविता


- डॉ. आनंदी जोशी १२
- सण होळीचा ३५

# राजूचा वाढदिवस

काल १७ मार्च. राजूचा वाढदिवस होता. त्या दिवशी शाळेला सुट्टी असल्याने दुसऱ्या दिवशी राजू शाळेत आल्यावर मित्रांनी त्याच्याभोवती गराडा घातला. राजूने सर्वांना चॉकलेट वाटले. मित्र विचारू लागले, राजू! काल तुझा वाढदिवस कसा साजरा झाला? कुठल्या हॉटेलमध्ये साजरा केला? तुला काय काय गिफ्ट मिळालं? बाबांनी तुला नवीन सायकल गिफ्ट दिली की मोबाईल? मित्रांनी प्रश्नांचा भडीमार सुरु केला. ते ऐकून राजू थोडासा गंभीर झाला. तेवढ्यात वर्गशिक्षक वर्गात आले. त्यांनीही राजूला शुभेच्छा दिल्या आणि सांगितलं राजू, काल तू वाढदिवस कसा साजरा केलास ते जरा आम्हालाही ऐकू दे.

राजू सांगू लागला, मित्रांनो, वाढदिवस केवळ भेटवस्तू घेण्यासाठी साजरा करायचा नसतो हे प्रथम माझ्या बाबांनी मला शिकवलं. ते दर वाढदिवसाला मला अनाथाश्रमात घेऊन जातात. तेथील निराधार मुलांना माझ्या हस्ते मिठाई आणि भेटवस्तूंचं वाटप करतात. यावेळी त्या मुलांच्या निरागस चेहऱ्यावर पसरणारं हास्य, डोळ्यात दिसणारा कृतज्ञतेचा भाव पाहून खूप समाधान वाटतं. तेव्हा कळतं, की खरा आनंद गिफ्ट घेण्यात नाही तर गिफ्ट देण्यात आहे. दरवर्षी माझा हा नित्याचा क्रम आहे. त्यानंतर आम्ही बागेत जाऊन एक छानसं झाडाचं रोप लावतो.काल मी लिंबाचं रोप लावलं. आता रोज खतपाणी घालून पुढच्या वाढदिवसापर्यंत त्याची जोपासना करणार आणि पुढच्या वाढदिवसाला पुन्हा एक झाड लावणार.त्यामुळे या दिवशी माझ्या बरोबर माझ्या वृक्षमित्रांचाही वाढदिवस असतो.

खरं सांगू का मित्रांनो, वाढदिवसाच्या परंपरागत कल्पनेतून थोडं बाहेर या. जगाकडे बघा.एखाद्याच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्याचा प्रयत्न करा. राजू तळमळीने बोलत होता. सारा वर्ग भारावून ऐकत होता.

तेवढ्यात मुख्याध्यापक वर्गात आले. त्यांनी राजूला प्रेमाने जवळ घेतलं.त्याला शाबासकी देत म्हणाले, बाळ! मी तुझं मनोगत वर्गाबाहेर उभं राहून ऐकत होतो.खरंच,आज तू सर्वांना एक नवीन दृष्टी दिलीस. संपूर्ण शाळेला तुझा नेहमी अभिमान वाटत राहील.

मुलांनी टाळ्यांच्या गजरात राजूचं कौतुक केलं आणि त्याला वचन दिलं, की आम्ही देखील आमचे वाढदिवस अशाच पद्धतीने साजरे करु, अशी शपथ घेतो.

प्रत्येक वाढदिवसाला जीवनातलं एकेक वर्ष कमी होत जातं, त्यामुळे उर्वरित आयुष्यात अधिकाधिक सत्कर्म घडत जावे. निसर्ग आपल्याला भरभरून देतो. कुठलीही अपेक्षा करत नाही, मग आपणहि निसर्गाचे देणं लागतो ना ! चला तर, वृक्षारोपणाबरोबर परिसरहि स्वच्छ ठेवू या.

- राजेंद्र थोरात •••





# नंदीची कथा

श्री शंकराचं वाहन कोणतं? असा प्रश्न विचारल्यावर त्वरित उत्तर येतं, नंदी. परंतु या नंदीला श्रीशंकराचं वाहन होण्याचं भाग्य कसं लाभलं त्याची एक कथा काशीखंड पुराणात आहे.

ब्रह्मदेवांचा नातू एक ऋषी होते. त्यांचं नाव होतं शिखी. एकदा ते इंद्राला भेटण्यासाठी इंद्रसभेत गेले; परंतु इंद्राने त्यांचे स्वागत तर केले नाहीच उलट मृत्युलोकातील हा ऋषी माझ्या दरबारात कशासाठी आला? अशा तिरस्काराच्या भावनेने त्यांच्याकडे पाहू लागला. शिखी ऋषींना या गोष्टीचा प्रचंड राग आला. ते क्रोधीत होत इंद्राला म्हणाले, हे इंद्र, माझं स्वागत करण्याएवढा शिष्टाचार सुद्धा तू पळत नाहीस एवढा तू उन्मत्त झालास? थांब, तुझा पराभव करील असा श्रेष्ठ पुत्र मी उत्पन्न करुन तुझी मिजास उतरवीन. असे म्हणून शिखी ऋषी रागारागाने तिथून निघून गेले. विंध्य पर्वतावर जाऊन त्यांनी

घोर तपश्चर्या केली. ब्रह्मदेवाला प्रसन्न करून आपल्या तपश्चर्येचे कारण सांगितले. ब्रह्मदेव म्हणाले, की हे सामर्थ्य फक्त श्रीशंकरापाशी आहे.

शिखी ऋषी काशीला गेले. तेथे त्यांनी तपश्चर्या करून श्री शंकरांना प्रसन्न करून घेतले. श्रीशंकरांनी ऋषींना एक मंत्र दिला आणि मानससरोवराजवळ जाऊन तेथे त्या मंत्राचा जप करायला सांगितले. जप पूर्ण झाल्यानंतर एक अद्‌भुत बालक उत्पन्न झालं. ते गाईच्या वासरासारखं दिसत होतं. ब्रह्मदेवाने त्याचं नाव नंदी असं ठेवलं. तो फार पराक्रमी आणि वैभवशाली होईल असंही सांगितलं.

एकदा नंदीने खूप भूक लागली म्हणून दूध प्यायला द्या असा हट्ट ऋषींकडे केला. तेव्हा ऋषींनी त्याला क्षीरसागर पिऊन तुझी भूक शांत कर असं सांगितलं. नंदी क्षीरसागर पिऊ लागताच विष्णूंचे दूत आले आणि त्यांनी नंदीशी युद्ध सुरू केले; परंतु नंदीने त्यांचा पराभव केला. त्यानंतर प्रत्यक्ष विष्णू आले.नंदीने विष्णूंनाही सळो की पळो करून सोडले. मग विष्णूंनी मोठे रूप धारण करत नंदीच्या तोंडावर प्रहार केला. नंदीच्या तोंडातून रक्त वाहू लागले. आता मात्र नंदी संतापला. भयंकर गर्जना करत त्याने श्रीविष्णूंच्या छातीवर पायानं आघात केला. दोघांचं युद्ध काही केल्या संपेना. शेवटी विष्णूंनी नंदीला वंदन करत आपला पराभव मान्य केला.

नंदी परत शिखी ऋषींजवळ आला. म्हणाला, मी खूप मोठं युद्ध जिंकून आलो. मला आता खूप भूक लागलेली आहे. तेव्हा शिखी ऋषी म्हणाले, अमरापुरीस खांडववनात जा. तुला तिथे भरपूर खाद्य मिळेल. नंदी त्या दिव्य वनात गेला आणि झाडाची पाने खाऊ लागला. तेथील वनरक्षक नंदीच्या अंगावर धावून गेले. नंदीने त्यांना चांगलेच झोडपले. ते इंद्राकडे गेले. इंद्र रागारागाने खूप मोठे सैन्य घेऊन नंदीवर चालून आला. नंदीने मात्र आपल्या शेपटाचा एक मोठा तडाखा देताच इंद्र भेलकांडत कैलास पर्वतावर श्रीशंकरांच्या पायाशी जाऊन पडला. आता श्रीशंकरांनाही राग आला. मग नंदी आणि शंकर यांच्यात भयंकर युद्ध सुरू झाले. नंदी शंकरांना भारी पडू लागला. तेव्हा शंकरांनी तिसरा डोळा उघडलाय परंतु त्याचा परिणाम नंदीवर काहीच झाला नाही. त्याने श्रीशंकरांची सगळी शस्त्रं गिळून टाकली. शेवटी शंकरांनी माघार घेत नंदीला सांगितले, नंदिकेश्वरा! तू माझाच अंश आहेस. मग तुझं माझं युद्ध कशाला? मी तुझ्यावर प्रसन्न आहे, तुला काय पाहिजे तो वर मागून घे. त्यावर नंदी रागावून म्हणाला, तुम्ही लढाईत हरला आहात. तुमच्याकडून मी का वर मागू? उलट तुम्हीच माझ्याकडून वर मागून घ्या. त्यावर श्रीशंकर म्हणाले, ठीक आहे. मी जे मागेल ते तू देशील? नंदी म्हणाला, हो हो अवश्य देईन. श्रीशंकर म्हणाले, तू माझं वाहन हो म्हणजे तुझ्यावर बसून मी त्रैलोक्याचा संहार करीन. त्यावेळी तुझी शक्ती माझ्या अंगी यावी. नंदीने तसे वरदान श्रीशंकरांना दिले. तेव्हा प्रसन्न होत शंकर म्हणाले, नंदिकेश्वरा, माझे भक्त भाविक माझं दर्शन घेण्याआधी तुझं दर्शन घेतील.

तेव्हापासून श्रीशंकराच्या मंदिरासमोर नंदीची स्थापना केली जाते आणि आधी नंदीला वंदन केले जाते.

❖❖❖

# लॅरी पेज




आजच्या मानवाच्या जीवनात अविभाज्य घटक मानला जाणारा संगणक (computer) ज्याच्या शिवाय सर्वच क्षेत्रात इकडचे पान तिकडे होत नाही, असं म्हणायला हरकत नाही. आपण संगणक चालू केल्यानंतर जेव्हा काहीतर पेज शोधायचे असते तेव्हा एक सर्च इंजिन येते. त्या सर्च इंजिनाचा शोध कोण लावला माहिती आहे? ते व्यक्तिमत्व म्हणजे अमेरिकेतील लॅरी पेज. प्रख्यात कॉम्प्युटर वैज्ञानिक आणि व्यावसायिक आहेत. त्यांनी १९९८ साली आपला मित्र सर्गी ब्रिजच्या मदतीने 'गुगल सर्च इंजिन' सुरु केले. ते साऱ्या जगभरात आवडणारे आणि लोकप्रिय ठरले.

लॅरी पेज यांचा जन्म २६ मार्च १९७३ साली संयुक्त राज्य अमेरिकेतील मिशिगन येथे झाला. त्यांचे आई वडिलही संगणक तज्ज्ञ होते. त्यामुळे लॅरी यांनीही स्टॅन फोर्ड युनिव्हर्सिटी, मिशिगन मधून कॉम्प्युटर इंजिनिअरिंग केले. तिथे त्यांना त्यांची भेट सर्गी ब्रिनशी झाली. आणि दोघांनी मिळून गुगल सर्च इंजिन बनविले.

बॅरीचे पूर्ण नाव लॉरेन्स पेज. त्यांचे वडील पेज प्रख्यात कॉम्प्युटर वैज्ञानिक असून आई कॉम्प्युटर प्रोग्रॅमिंगची शिक्षिका होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण मिशिंगन मधील ओकेमॉस मॉन्टेसरी स्कूलमध्ये झाले. माध्यमिक पुढील शिक्षणानंतर स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीतून कॉम्प्युटरमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन केल्यावर 'वर्ल्ड वाईब वेबच्या लिंक संरचना' विषयावर त्यांनी पी. एच.डी. केली. दोघांच्या चार वर्षाच्या संशोधनानंतर त्यांनी गुगलचे प्राथमिक व्हर्जन बनविले. ज्याने जगभरात आपले स्थान निर्माण केले.

'गुगल' हे नांव गणिताचा शब्द गोगोल (900901) पासून घेतले आहे. ज्याचा अर्थ अंक 1 ज्याच्यापुढे शंभर शून्ये लावली जातात. आपले मित्र, कुटुंब, गुंतवणूकदारांकडून १० लाख डॉलर्सचे कर्ज घेतले. नंतर लॅरी आणि ब्रून यांनी १९९८ साली 'गुगल इंक' कंपनीची

(पान ९ वर)






# अनुभवाचे ज्ञान

एका गावात एक कीर्तनकार बुवा राहत होते. ते रोज संध्याकाळी गावात कीर्तन करुन लोकांना भक्तिमार्ग शिकवत असत. त्यांच्या कीर्तनाला लोकांची खूप गर्दी जमत असे. लोक त्यांचे कीर्तन तल्लीन होऊन ऐकत असत. त्याच गावात नदीपलीकडील गावातून एक गवळण दूध विकायला येत असे. दूध विकून झाल्यानंतर संध्याकाळी कीर्तन ऐकूनच ती आपल्या गावी परतत असे.

एके दिवशी तिला त्या गावात येण्यासाठी होडी लवकर मिळाली नाही. त्यामळे ती कीर्तनालाही उशिरा पोचली. कीर्तन संपायला आले होते. फक्त कीर्तनकार बुवांच्या शेवटच्या काही ओळी तिच्या कानी पडल्या. त्यात ते म्हणाले होते, की ईश्वरावर जर अतूट श्रद्धा–विश्वास असेल तर माणूस भवसागर सहज पार करू शकतो.

हे वाक्य गवळणीच्या हृदयात कोरले गेले. ती मनात विचार करू लागली, महाराज म्हणतात त्याप्रमाणे जर ईश्वरावर अतूट विश्वास ठेवला तर माणूस भावसागर पार करु शकतो. मग आपल्याला बिनाहोडीचं नदी पार करायला काय अवघड आहे? दुसऱ्या दिवशी ती दुधाचा हंडा डोक्यावर घेऊन नदीकाठी आली आणि अतिशय विश्वासाने ईश्वराचं नाव घेत नदीच्या पाण्यावरून चालत पैलतीरावर आली. कीर्तनकार बुवांनी विचारलं, आज एवढ्या लवकर कशी? ती म्हणाली महाराज, काल तुम्ही सांगितलं ना ईश्वराचं नाव विश्वासाने घेतलं तर माणूस भवसागर पार करु शकतो, तर मी नदी का पार करु शकणार नाही! म्हणून मी पण ईश्वराचं नाव घेत सहज नदी पार करून आले. कीर्तनकारबुवांचा या गोष्टीवर विश्वास बसेना. ते म्हणाले, हे कसं शक्य आहे? चल मी येतो तुझ्यासोबत. कीर्तन संपल्यावर बुवा तिच्या सोबत नदीवर गेले. गवळण हात जोडत श्रद्धा भावनेने ईश्वराचं स्मरण करत पाण्यावर चालू लागली. बुवांनी सुद्धा ईश्वराचं नाव घेत भीत भीत नदीच्या पाण्यात टाकला, तिने मागे वळून पाहिले तर कीर्तनकार बुवा मात्र पाण्यात गटांगळ्या खाताना दिसले.

ते गवळणीच्या चरणी नतमस्तक होत म्हणाले, एवढी वर्षे मी फक्त लोकांना तोंडी उपदेश देत आलोय; पण तू मात्र तो विश्वास जीवनात धारण केला. खरंच माझ्या पोकळ पांडित्यापेक्षा तुझी भोळी भाबडी भक्तीच श्रेष्ठ आहे.

अनुभवाचे ज्ञान हेच खरे ज्ञान.

❖❖❖

# लॅरी पेज

(पान ७ वरुन)

स्थापना केली. गुगलचे मुख्य कार्यालय ‘सरासरी’ हे कॅलिफोर्नियातील सिलिकॉन व्हॅली येथे आहे. ऑगस्ट २००४ साली गुगल शेअर मार्केटमध्ये उतरले आणि त्यातून लॅरी आणि ब्रिज कोट्याधीश झाले.

२००६ साली गुगलने व्हिडिओ वेबवर अपलोड करण्याची ‘युटयुब’ साइट १६५ कोटी डॉलरला विकत घेतली. २०१३ च्या सप्टेंबरमध्ये ‘फोबर्सच्या ४०० अमेरिकन श्रीमंतांच्या यादीत लॅरी १३ व्या स्थानावर आहे. त्याचवर्षी ऑक्टोंबरमध्ये ‘फोर्सने’ सर्वात शक्तीशाली व्यक्तींच्या यादीत लॅरीला १७ वे स्थान दिले. आजही गुगलचे सी.ई.ओ. लॅरी हे कंपनीची प्रगती व्हावी, यासाठी सक्रिय आहेत. ब्रिज हे गुगलचे खास परियोजनांचे डायरेक्टर आहेत.

आज या संगणक जगतात उल्लेखनीय कार्यासाठी त्यांना अनेक पुरस्कार, सन्मान देण्यात आले आहेत. ज्यात ‘मार्कोनी फाउंडेशन पुरस्कार’ टेक्नीकल एक्स्लन्स पुरस्कार, वेब्बी अँवार्ड सर्च इंजिन पुरस्कार इत्यादी पुरस्कार आहेत. काही वर्षापूर्वीपर्यंत जर गुगलसारख्या सर्च इंजिनाची शक्यता जरी बोलून दाखवली असती तर त्याला तेवढ्यात काढले असते. अशी अशक्य गोष्ट लॅरी आणि ब्रिनने प्रत्यक्षात उतरवली आहे.

❖❖❖



विचारपुष्प

# संकुचित भाव सोडावा

एकदा एका मुलासोबत संवाद साधत असताना त्याने सांगितले, की घोडेस्वारीच्या स्पर्धेमध्ये त्याने भाग घेतला होता. त्याला स्पर्धेसाठी जो घोडा देण्यात आला होता तो त्याच्या परिचयाचा नव्हता. त्यामुळे तो घोडा काही केल्या नियंत्रणात येत नव्हता. स्पर्धा जवळ आली होती. त्या मुलाला सराव करायचा होता. घोड्याचं देखील एक तंत्र असतं, नवीन घोडेस्वाराला तो कधीच आपल्या पाठीवर स्वार होऊ देत नाही. अशा परिस्थितीत सराव कसा करावा अशी चिंता वाटू लागली. मग त्याला एक युक्ती सुचली. त्याने घोड्याला रोज गूळ आणि चणे खाऊ घालायला सुरुवात केली. घोडा ज्यावेळी खाऊ लागे, त्याच वेळी मुलगा त्याच्या पाठीवरती खोगीर घालत असे. हळूहळू त्याचा लगाम हातात घेऊन तो त्याच्यावर स्वार होऊ लागला. घोड्याला त्याच्या आवडीचं खाद्य मिळत असल्यामुळे तो घोडेस्वाराला आपल्या पाठीवर स्वार होऊ देत होता. अशा प्रकारे मुलाने आपला सराव चांगला केला आणि शर्यत जिंकला.

या उदाहरणावरून हे लक्षात येतं, आपल्याला वाटतं की दुसऱ्याचा स्वभाव चांगला नाही; परंतु त्याचाही स्वभाव बदलता येतो. यासाठी आधी आपल्यामध्ये बदल केला पाहिजे. म्हणजे आपोआपच दुसऱ्यामध्ये बदल होऊ शकतो. माणसाने आपला स्वत:चा स्वार्थ बाजूला ठेवून इतरांचाही विचार केला पाहिजे. त्यात आपला देखील फायदा होत असतो. एका शेतकऱ्याने आपल्या शेतात मका पेरला. त्याच्या कणसांची गुणवत्ता खूप चांगली होती. त्यामुळे दाणेदार कणसं येत असत. इतर शेतकरी त्याला विचारत, की तुमच्या शेतात एवढा चांगला मका कसा पिकतो? तेव्हा शेतकरी म्हणाला, मी बियाणं उत्तम प्रकारचं वापरतो. शिवाय माझ्या शेजारी शेत असलेल्या शेतकऱ्याला माझ्याकडचं उत्तम बियाणं देखील देत असतो. त्यामुळे त्यांच्या शेतात देखील चांगलं पीक येतं

आपल्याला ठाऊकच आहे की मक्याच्या पिकावरचे परागकण वाऱ्याने उडत असतात.ते आपल्या शेतात येतात. तेव्हा आपला मका देखील चांगल्या प्रकारे उगवतो. सर्वांना सोबत घेऊन पिकाची लागवड केली. त्यामुळे माझेही पीक चांगले आले आणि इतरांचीही पीकं चांगली आली. निरंकार कृपा करो, आपणा सर्वांची मनं देखील अशीच विशाल होत जावोत. मनामध्ये जर उच्च–नीच, जातीपातीचे आणि अंधविश्वासाचे भाव असतील तर आपण संकुचित होत जाऊ. आपलं मन विशाल होणार नाही. जसं लहानपणी हत्तीला दोरीने बांधता येऊ शकतं; परंतु मोठेपणी त्याला साखळदंडच लागतात. परंतु जर कधी हत्ती लहान असताना त्याच्या पायात दोरी बांधली, त्यावेळी तो ती दोरी तोडू शकत नाही; परंतु जेव्हा त्याच्या अंगवळणी पडतं की ही दोरी तोडणं आपल्याला शक्य नाही तेव्हा तो मोठा झाल्यानंतर जरी पायात दोरी बांधलेली असली तरी तो हेच समजतो, की आपल्याला ही दोरी तोडणं शक्य नाही. जुन्या सवयीमुळे तो तसा विचार करतो. म्हणून आपण देखील एखादी जुनी सवय सोबत घेऊन चाललो तर ती आपल्याला संभ्रमात टाकते आणि तिथेच आपली प्रगती थांबते. म्हणून सतत विवेकबुद्धीचा वापर करावा. प्रगतीपथावर जाण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन पुढे जात राहावे. दातार कृपा करो, सर्वांना विशालता प्राप्त होवो.

❖❖❖

❖ भक्ताची पारख धन-दौलत किंवा श्रीमंतीने होत नाही. जर आपण विचार केला की, अमुक एक महापुरुष अनेक वर्षांपासून सत्संगात येतोय; त्याने ईश्वराचं ज्ञानही प्राप्त केलय म्हणजे आता तो लखपती किंवा करोडपती झाला असेल तर ही आपली चूक आहे. भक्ताची वास्तविक पारख त्याच्या भावनेवरुन होत असते. त्याचं जीवन एकरस असतं. दुसऱ्याचा तो कधीही अनादर करत नाही. कुणाचं मन दुखवत नाही. तो सदैव समाधानी असतो. ईश्वराच्या इच्छेत जगतो.

❖ मनाला समजवायचं असतं. हेच मन राम आणि रावण बनून जातं, हेच संकीर्ण आणि विशालही बनतं, हेच गोड आणि कडू होतं म्हणून या मनाला समजवण्याची आवश्यकता आहे. जर हे समजले तर जीवन सुंदर बनेल. घोड्याला लगाम लावली तर तो उपयोगी बनतो नाहीतर नुकसानीला कारण बनतो. म्हणूनच मनाला चेतन केलं जातं. याला लगाम लावण्याच्या गोष्टी केल्या जातात नाहीतर मन लोभी आणि लालची बनून जाईल. लगाम असेल तर वाणी मधुर राहील, मन बेलगाम घोडा बनणार नाही.

– युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजी महाराज

# डॉ. आनंदी जोशी



खेळ खेळता भातुकलीचा
संसाराचा मांडला थाट
सौभाग्य हे लाभले म्हणता
विलक्षण निर्मिला जीवन घाट

शिक्षणाचे व्रत साकारले
समाजाचा घेऊन रोष
विश्वास, निष्ठा अन् जिद्दीने
दूर केला सारा दोष

सातासमुद्रा गेली पार
डॉक्टरकीचा घेऊन ध्यास
साथ घेऊन सौभाग्याची
वैद्यकीय पदवी केली पास

परदेशी जाऊन जपली तुम्ही
आपली संस्कृती, परंपरा
राणी व्हिक्टोरियाने केला
सन्मान आपुला खराखुरा

पहिली महिला वैद्य म्हणून
मराठमोळ्या स्त्रीचा मान
नाव डॉ.आनंदी जोशी
याचा आम्हा आहे अभिमान

शुभांगी म्हात्रे (पनवेल)

# दादाला विचारू या..!

## प्रश्न आपल्या मनातले, उत्तर सद्‌गुरु बाबाजींचे

प्रश्न : ब्रह्मज्ञानाची प्राप्ती किंवा ईश्वरदर्शन झाल्यानंतर ग्रंथ–शास्त्र वाचण्याची काय आवश्यकता आहे?

उत्तर : ब्रह्मज्ञानप्राप्ती किंवा ईश्वरदर्शन झाल्यानंतर जो ईश्वर आपण पाहिला तो कळावा यासाठी ग्रंथ शास्त्रांच्या वाचनाची आवश्यकता आहे. ईश्वराचे प्रत्यक्ष दर्शन किंवा बोध घेतलेल्या पुरातन साधुसंत ऋषी–मुनींनी ईश्वराचे जे वर्णन लिहून ठेवलेले आहे ते आपण घेतलेल्या ब्रह्मज्ञानाशी तंतोतंत जुळतं की नाही याची खात्री करता येते.आपली खात्री पटली तर ब्रह्मज्ञान दृढ होते. ईश्वरावरचा विश्वास पक्का होतो. म्हणून ब्रह्मज्ञानी साधुसंतांनी लिहिलेले ग्रंथ–शास्त्र वाचणे अत्यंत गरजेचे आहे.

प्रश्न : 'गुरुर्ब्रह्मा गुरु विष्णू गुरू देवो महेश्वरा' अर्थात गुरुला ब्रह्मा विष्णू महेश यांची उपमा का दिली जाते?

उत्तर : ग्रंथ शास्त्रात असं म्हटले आहे, की सृष्टीचा कार्यभार परमात्म्याने तीन शक्तींकडे सोपवलेला आहे. ब्रह्मदेवाकडे सृष्टीची निर्मिती म्हणजे जीव सृष्टी करणे, विष्णू देवांकडे पालन पोषण करणे, तर महेशाकडे सृष्टीचा संहार करणे ही तीन कार्ये सोपवलेली आहेत. वास्तविक पाहता ही तिन्ही कार्ये केवळ एकाच निराकार शक्तीकडून होत असतात. सद्‌गुरु हे निराकाराचं साकार रूप असल्याने पर्यायाने या तिन्हींचा कर्ता सद्‌गुरूच असतो.दुसरी गोष्ट म्हणजे सद्‌गुरु शरण आलेल्या अज्ञानी जीवाला ब्रह्मज्ञान देऊन पुनर्जन्म देतो. विष्णूदेवाप्रमाणे त्या भक्ताचे नित्यप्रती रक्षण करून त्याचा पाठीराखा बनतो. तसेच महेशाप्रमाणे भक्ताच्या जीवनातील त्रिविध ताप,अविद्या अज्ञान यांचा नाश करतो. म्हणून गुरुला ब्रह्मा विष्णू महेश यांची उपमा दिली जाते.

प्रश्न : आत्मिक आनंद आणि भौतिक आनंद यात काय फरक आहे?

उत्तर : वास्तविक पाहता आनंद या शब्दाला विरुद्धार्थी शब्दच नाही. आनंद केवळ आनंदच असतो. त्याचा कोणताही प्रकार नसतो. शारीरिक सुखाला भौतिक आनंद म्हटले जाते.वास्तविक तो आनंद नसून आनंदाचा आभास असतो. भौतिक सुख हे कायम टिकणारे नसते. परिस्थितीनुसार ते कमी जास्त होत असते. परंतु आत्मिक आनंदाचं तसं नाहीये. आत्मा परमात्म्याच्या एकरूप अवस्थेने आत्मिक आनंदाची प्राप्ती होते. हा आनंद बाहेरील कोणत्याही गोष्टीने कमी जास्त होत नाही.



# शब्दकोडे

# २१६

○ विकास अरोडा ( रेवाडी-हरियाणा )

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ■ | ३ | | ४ |
| | ■ | ५ | | | ■ | |
| | ■ | | ■ | ६ | | |
| ७ | ८ | | ■ | | ■ | ■ |
| ■ | | ■ | ९ | ■ | १० | ११ |
| १२ | | १३ | | १४ | | |
| | ■ | | ■ | | ■ | |
| १५ | | | | ■ | १६ | |

## आडवे शब्द

१. यमुना नदीच्या काठी वसलेले उत्तर प्रदेशातील एक ऐतिहासिक शहर

३. ....या देशाची राजधानी कोलंबो आहे.

५. उगवत्या सूर्याचा देश ... देशाला म्हटले जाते

६. एक काव्याचा प्रकार

७. कौरवांचा मामा

१०. ब्राह्मो समाजाची स्थापना राजा .... मोहन रॉय यांनी केली

१२. सरदार वल्लभ भाई पटेल भारताचे पहिले ....होते

१५. रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील एक पर्यटन स्थळ

१६. दात कोरुन .... भरत नसते (म्हण)

## उभे शब्द

१. श्री गणेशाचे एक नाव

२. राजस्थानची प्रमुख भाषा

३. 'शालीमार बाग' कुठे आहे ?

४. अफगाणिस्तानची राजधानी

८. सुंदर रुप-रंग नसलेला

९. भारताने टोकियो ऑलम्पिकमध्ये एकूण ....पदकं जिंकली

१०. श्रीकृष्णाची सखी

११. घड्याळ बांधण्याची जागा

१२. एक नाश्त्याचा पदार्थ

१३. 'जागतिक ग्राहक अधिकार दिन' मार्च महिन्याच्या ....तारखेला साजरा करतात.

१४. संत निरंकारी मिशनमध्ये ब्रह्मज्ञान घेताना पाच .....समजावले जातात.

उत्तरे इतरत्र



## वैज्ञानिक प्रश्नोत्तरे



प्रश्न : वनस्पती प्राण्यांना खाऊ शकतात काय ?

उत्तर : काही वनस्पती अशा आहेत की, ज्या प्राण्यांना खातात. अशा वनस्पतींना कार्निव्होरस (मांसभक्षक) म्हणतात. अशा वनस्पती छोट्या प्राण्यांना खाऊन पचवतात आणि त्यांच्यापासून त्यांना मिळणारा नायट्रोजन हा वनस्पतींच्या पोषणाला उपयुक्त ठरतो.

या मांसभक्षक वनस्पती एखाद्या प्राण्याला पकडतात आणि त्याच्यावर विशिष्ट रसाचा प्रयोग करतात. या रसामुळे प्राणी विरघळतो. मग तो रस वनस्पती शोषून घेतात आणि त्याबरोबर नायट्रोजनही शोषून घेतला जातो, जो प्राण्यामुळे मिळालेला असतो.

मांसभक्षक वनस्पती अनेक प्रकारच्या आहेत. काहींचे मार्ग धूर्तपणाचे लालूच दाखवून फसविण्याचे आणि पकडण्याचे आहेत. व्हीनस फ्लाय नावाच्या वनस्पतीची पाने मध्यभागी बिजागरी बसविलेल्या दोन भागांची असतात आणि पानांच्या कडांना लांब केसांची योजना असते. एखादा किटक पानांच्या लाल रंगाने आकर्षित होऊन जवळ आला, की पाने झटकन मिटून किटकाला सापळ्यात पकडतात. उष्ण प्रदेशात पिचर नावाच्या मांसभक्षक वनस्पती असतात. या वनस्पतींची पाने एखाद्या खोलगट भांड्यासारखी किंवा सुरईसारखी असतात. या वनस्पतींच्या जवळ येणारा किटक किंवा लहान आकाराचा प्राणी या भांड्यात पडतो आणि अडकून राहतो. पुढे तो वनस्पतींकडून फस्त केला जातो.

सर्वात विलक्षण अशी मांसभक्षक वनस्पती ही ब्लॅडखोटे नावाने ओळखली जाते. ही वनस्पती पाण्याच्या प्रवाहावर तरंगत असते. पाण्याच्या खाली बुडबुड्यांसारख्या भासणाऱ्या पिशव्या असतात. ह्या पिशव्या म्हणजे छोटे जलचर प्राणी पकडण्याचे सापळेच असतात. पाणमाशा, छोटे मासे अशांसारखे प्राणी येथून जाताना त्यांचा पिशवीला स्पर्श झाला, की पिशव्या उघडल्या जातात आणि आपले भक्ष्य आत खेचून घेतात.

प्राणी वनस्पती खातात, पण काही वनस्पती प्राण्यांना खातात. हे खरे असूनही सहज विश्वास बसण्यासारखे नाही.




अशाप्रकारच्या काही वनस्पती सज्जनगडाच्या पायथ्याशी असणाऱ्या गावात सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात पाहायला मिळतात.



# आजोबा

चित्रांकन लेखन, रंग
अजय कालडा






धर्मशाळा
रात्र एका धर्मशाळेत घालवावी असा विचार व्यापाऱ्याने केला. तो धर्मशाळेच्या दरवाजापर्यंत गेला.
व्यापारी धर्मशाळेचा दरवाजा मोठमोठ्याने ठोठावू लागला.
खूप वेळानंतर आतूनच एक पहारेकरी म्हणाला, मला सांगायला वाईट वाटतय की दरवाजाची किल्ली हरवली आहे. आता चांदीच्या किल्लीनेच दरवाजा उघडेल.


व्यापारी समजून गेला की पहारेकऱ्याला काय हवंय ? त्याने दरवाजाच्या खालून चांदीचं एक नाणं आत सरकवलं.
नाणं मिळताच दरवाजा उघडला आणि व्यापारी आत गेला.
आतमध्ये येताच व्यापाऱ्याने पहारेकऱ्याला खाण्याचे पदार्थ आणायला पाठवले ते आणायला पहारेकरी बाहेर गेला.
पहारेकरी बाहेर जाताच व्यापाऱ्याने धर्मशाळेचा दरवाजा बंद करुन घेतला.


पहारेकरी अन्नपदार्थ घेऊन परत आला आणि दरवाजा जोर जोरात ठोठावू लागला.
तेव्हा आतून आवाज आला की हा दरवाजा आता चांदीच्या चावीशिवाय उघडणार नाही.
नाईलाजाने पहारेकऱ्याला चांदीची नाणी परत करावी लागली.
म्हणतात ना, मुलांनो 'जशास तसे ' शेरास सव्वाशेर कधी ना कधी भेटतोच. मग तो कोणत्याही रुपात असो.



कथा

# माकडाला अद्दल घडली

दिनकर काका सुतारकाम करुन आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवत. सुतारकामासाठी त्यांना पुरेशी जागा नसल्याने ते एका झाडाखालीच काम करत. त्या झाडावर एक माकड राहत होतं. ते फारच खोडकर होतं.दिनूकाका काम आटोपून जेवायला गेले, की माकड खाली उतरून त्यांचे सामान इकडे तिकडे फेकून देई. कधी झाडावरची कच्ची फळं खाली फेकत असे. असे रोज रोज होऊ लागले. माकडाच्या त्रासाला काका कंटाळले होते. देवा, माकडाला सद्बुद्धी दे अशी प्रार्थना करण्याशिवाय ते काहीच करु शकत नव्हते. शेवटी देवाला त्यांची दया केली .

काकांनी एक लाकडाचा ओंडका मध्यभागी कापायला घेतला होता. मध्यापर्यंत

(पान २२ वर)



# नैतिक विकासासाठी

आपले ऋषीमुनी थोर संशोधक होते. त्यापैकीच आयुर्वेदाचं संशोधन करणारे एक महान ऋषी होते महर्षी चरक. त्यांच्या जीवनातील ही घटना आहे.

महर्षी चरक यांना आयुर्वेदाचे आद्य प्रणेते म्हटले जाते. वनस्पतींच्या शोधात ते अनेक वर्षे फिरले. त्याच्यावर संशोधन करून त्यांनी अनेक औषधं बनवली व त्याची माहिती चरक संहिता या आपल्या ग्रंथात लिहून ठेवली.

एके दिवशी औषधी वनस्पतींच्या शोधात फिरत फिरत ते एका शेताजवळ आले.शेताच्या बांधावर त्यांना एक सुंदर फूल उमललेले दिसले. त्या फुलाकडे पाहून त्यांना त्याचे औषधी गुणधर्म देखील उमगले. हे दुर्मिळ फूल आपण घेऊन जावे असे त्यांना

क्षणभर वाटले; पण संस्कारामुळे तसे करण्यास त्यांचे मन धजावत नव्हते. फूल घ्यावे की घेऊ नये अशी चलबिचल त्यांच्या मनात चाललेली होती. त्यांची ही अवस्था शिष्यांच्या लक्षात आली. एक शिष्य त्यांना विनम्रपणे म्हणाला, “गुरुवर्य, आपली आज्ञा असेल तर ते फूल मी तोडून आणू का?” महर्षी चरक म्हणाले, वत्सा! ते फूल खरोखरच महत्त्वपूर्ण आहे पण या शेताच्या मालकाच्या परवानगीशिवाय ते घेणे म्हणजे चोरी करणे ठरेल. महर्षींच्या या उच्च आदर्शवादी व्यवहारापुढे व नैतिकतेपुढे शिष्याने मान खाली घातली. त्यानंतर ते आपल्या शिष्यांसह तेथून दहा कोसावर असलेल्या शेतकऱ्याच्या घरी गेले आणि त्याची परवानगी घेऊनच त्यांनी ते फूल तोडले.

कित्येकदा लहान–सहान गोष्टींकडे आपण दुर्लक्ष करतो.त्यामुळे नकळतपणे आपण आपल्या चारित्र्यात्मक विकासात अडथळा निर्माण करतो.

म्हणूनच नैतिक आणि चारित्र्यात्मक विकासासाठी प्रत्येक गोष्टीतील नीतिनियम पाळायला हवेत.

❖❖❖

## माकडाला अद्दल घडली

(पान २० वरुन)

कापून झाल्यानंतर त्याचे दोन भाग करण्यासाठी मध्ये (पाचर) खुंटी अडकवून ठेवली.दुपार झाल्यामुळे जेवून आल्यावर पुढचं काम करु म्हणून ते घरी गेले.

झाडाखाली कोणी नाही असे पाहून माकड खाली उतरले आणि इकडे तिकडे उड्या मारु लागले.काकांच्या हत्यारांशी खेळू लागले.त्याचं लक्ष अर्धवट कापलेल्या ओंडक्याकडे गेलं. ओंडक्यावर बसून माकडाने फटीत अडकवलेली पाचर हलवून हलवून काढून टाकली! परंतु ओंडक्याच्या फटीत त्याची शेपूट अडकल्याचे त्याच्या लक्षात आले नाही. पाचर निघून गेल्यामुळे त्याची शेपटी चिमटीत पकडल्यासारखी झाली. माकड मोठमोठ्याने ओरडू लागलं. माकडाच्या ओरडण्याचा आवाज ऐकून दिनूकाका धावतच आले. त्यांनी पुन्हा पाचर मारून माकडाची शेपटी अलगद सोडवली. आता मात्र माकडाला चांगलीच अद्दल घडल्याने दिनूकाकांना त्रास द्यायला ते पुन्हा खाली आलेच नाही.

❖❖❖

॥ साधना ॥

**टी.व्ही. वर प्रत्येक मंगळवार व गुरुवार, सकाळी ७.०० ते ७.३० वाजेपर्यंत**

**सद्‌गुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि बाबा हरदेवसिंहजी महाराजांच्या प्रवचनांचे प्रसारण**

# भारतरत्न

भारतरत्न हा भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार आहे. हा सन्मान राष्ट्र सेवांकरिता दिला जातो. या सेवांमध्ये कला, साहित्य, विज्ञान, सार्वजनिक सेवा आणि खेळ यांचा समावेश होतो. या पुरस्काराची स्थापना–सुरवात १९५४ मध्ये भारताचे तत्कालीन राष्ट्रपती श्री. राजेंद्र प्रसाद यांच्या द्वारा केली गेली. सुरूवातीला हा पुरस्कार मरणोपरांत देण्याची घोषणा केली गेली नव्हती; परंतु १९५५ नंतर त्यामध्ये सुधारणा केली गेली. आतापर्यंत (२०१९) एकूण ४८ व्यक्तींना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यातील बारा व्यक्तींना हा सन्मान मरणोत्तर दिला गेला आहे. एका वर्षामध्ये जास्तीत जास्त तीन व्यक्तींना हा पुरस्कार दिला जाऊ शकतो. या पुरस्काराचे प्रथम मानकरी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन हे होते.



या पुरस्कार प्राप्त कर्त्यांना भारत सरकारतर्फे एक प्रमाणपत्र आणि मानचिन्ह दिले जाते. याव्यतिरिक्त भारतात प्रथम श्रेणी विमान व रेल्वेकडून मोफत प्रवासाची सुविधा दिली जाते. ज्या ठिकाणी सरकारी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, अशा ठिकाणी भारतरत्न पुरस्कार प्राप्त कर्त्यांना राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, माजी राष्ट्रपती, उपपंतप्रधान, मुख्य न्यायाधीश, लोकसभा सभापती, कॅबिनेट मंत्री, मुख्यमंत्री, माजी पंतप्रधान आणि संसदेच्या दोन्ही सभागृहाचे विरोधी पक्ष नेते यांच्या स्थानानंतर स्थान मिळते. राज्य सरकार देखील भारतरत्न प्राप्त कर्त्यांना आपापल्या राज्यांमध्ये सुविधा उपलब्ध करतात.

## पुरस्काराचे स्वरूप :

सध्याचे भारतरत्न पुरस्काराचे स्वरूप म्हणजे एक सोनेरी पिंपळाच्या पानावर एका बाजूला मधोमध सूर्यप्रतिमा व तिच्याखाली भारतरत्न असे शब्द व दुसऱ्या बाजूला भारताचे राष्ट्रीय चिन्ह चौमुखी सिंहाची प्रतिमा अंकित केलेली असते.

पुरस्कार मिळवणाऱ्या व्यक्तींना कुठलीही विशेष पदवी किंवा मानधन वगैरे दिले जात नाही. पण त्यांना –

★ Indian order of precedence मध्ये ७वे स्थान मिळते.

★ भारतात मोफत प्रथम श्रेणी विमान व रेल्वेचा प्रवास

★ टॅक्समधुन सुट, पेन्शन ५०% किंवा पंतप्रधानाच्या पगाराएवढी

★ राज्यसभा व लोकसभेच्या अधिवेशनास हजर राहू शकतात

★ Z दर्जाची सुरक्षा प्रदान केली जाते

★ गणतंत्र व प्रजासत्ताक दिवसाचे प्रमुख आतिथी

★ त्यांच्या एका नातेवाईकाला सरकारी नोकरी

# सीताफळ



## एक उत्तम टॉनिक!

उष्णतेचा त्रास कमी करण्यासाठी सीताफळ हे उत्तम फळ आहे. शरद ऋतूत पित्ताचा त्रास होतो. अशावेळी दुपारी उन्हाचा भर असताना एक सीताफळ खावे. सीताफळाची पाने चाईवर अत्यंत गुणकारी आहेत. सीताफळाच्या बियांचे चूर्ण शिकाकाईसारखे लावावे आणि केस धुवावेत. केस स्वच्छ, लांब आणि मुलायम होतात शिवाय उवाही मरतात. मात्र पानांचा रस डोळ्यांत जाऊ देऊ नका. कारण **सीताफळाची पाने विषारी द्रव्यांनी युक्त असतात.**

**केसांसाठी :** सीताफळाच्या पानांचा पाट्यावर वाटून रस काढा आणि रसाने डोक्यावर मसाज करा. दिवसातून दोन वेळा हा प्रकार करा. मसाज झाल्यावर दीड तासांनी आंघोळ करा. हा दिनक्रम काही दिवस चालू ठेवला की, डोक्यावरचे गेलेले केस पुन्हा उगवू लागल्याचा आश्चर्यजनक अनुभव येईल.

**जखमेसाठी :** सीताफळाच्या पानांची वाटून चटणी करा. त्यात सैंधव घालून पोटीसासारखी जखमेवर बांधा. त्याने जखमेतील किडे नष्ट होतात. सीताफळाच्या सालीमध्येही जखम साफ करण्याचा, जंतू नष्ट करण्याचा गुणधर्म आहे. सुका इसब असल्यास पानांची चटणी करुन त्यात हळद टाकून तो लेप गरम करुन पोटीसासारखा लावावा. लाभ होतो.

**बेशुध्द रुग्णासाठी :** सीताफळाच्या पानांचा रस हिस्टेरियाने बेशुध्द झालेल्या रुग्णाच्या नाकात टाकल्यास तो शुध्दीवर येतो. सीताफळाच्या बियांच्या धुराचा उपयोग हिस्टेरिया आणि फेफरे यामुळे आलेल्या मुर्च्छेवर होतो. सीताफळाच्या बियांचा आतील पांढरा भाग घेऊन तो वाटून कापडात घालून त्याची वात करावी आणि ती पेटवावी. त्याचा जो धूर येईल तो हिस्टेरिया अथवा फेफरे येऊन मुर्च्छित झालेल्या रुग्णाच्या नाकात जाताच तत्काळ शुध्दीवर येतो.

**दक्षता :** ज्यांना वारंवार सर्दी आणि खोकला होण्याची सवय जडली आहे, त्यांनी सीताफळ खाऊ नये. रिकाम्या पोटी सकाळी सीताफळ खाऊ नये. विशेषत: फलाहार करणाऱ्यांनी हे लक्षात ठेवावे. सीताफळाच्या पानांचा रस डोळ्यांत जाणार नाही याची काळजी घ्यावी. सूज येणाऱ्या कोणत्याही रोगविकारात सीताफळ खाऊ नये.



# विविधतेत एकता

जात–पात आणि संकुचित भावना, जसे हा माझा प्रांत आहे, तो कुणा दुसऱ्याचा प्रांत आहे; ही माझी भाषा, ती त्याची भाषा अशा कोत्या भावनेपासून आपण वर यावे. इथं अनेकता तर असणारच आहे. भाषादेखील विविध प्रकारच्या राहणार. खाण्या–पिण्याच्या पद्धती, वेशभूषा भिन्न असणारच आहेत. एवढा मोठा देश आहे; परंतु एवढी विविधता असूनही एकतेच्या सूत्रात आपण मोती ओवले आहेत. ज्याप्रमाणे एका धाग्यात आपण विविध रंगाचे मोती ओवतो. मोती रंगीत असतात. लाल रंगाचा मोती ओवल्यानंतर पिवळ्या रंगाचा मोती ओवला तर लाल रंगाचा मोती कधी असं म्हणत नाही, की तू माझ्या शेजारी नको म्हणून! मी तुला इथं सहन करु शकत नाही. असं कधीही होत नाही. त्या धाग्यात कोणत्याही रंगाचे मोती ओवले जातात. धाग्यात कोणत्याही रंगाची फुलं ओवली जातात आणि हार बनवला जातो. अशाप्रकारे हा आपला देश एकच आहे इथं विविधता आहे ती फक्त खाण्या–पिण्यात, वेशभूषेत, भाषेत; परंतु इथं आपल्याला एकतेची भावना निर्माण करायची आहे. जमीन एकच आहे, परमात्मा एकच आहे, हा निराकार–अकालपुरुष एकच आहे. अनेकतेत एकता पाहणं हा तर भारतीय संस्कृतीचा महान गुण आहे. आपण प्रत्येकासाठी भल्याची कामना करायची आहे आणि आपलं जीवन महान बनवायचं आहे.

मानवा–मानवामध्ये वास्तविक एकता तेव्हाच येते, जेव्हा ते एक परमपिता परमात्म्याला, या सर्वव्यापी रामाला जीवनात धारण करतात. जोपर्यंत आपल्या सर्वांचं नातं या एका प्रभुशी जोडलं जात नाही, तोपर्यंत एक मनुष्य दुसऱ्या मनुष्यापासून वेगळाच राहील. त्यांना एकमेकांजवळ आणण्यासाठी केलेले सारे प्रयत्न अयशस्वी ठरतील. हे प्रयत्न यशस्वी तेव्हाच होतील जेव्हा आपण त्यांना या ज्ञानाच्या धाग्यात ओवून ठेवू.

❖❖❖





# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



अर्पण ठाकूर



प्रणित सोनावणे



श्रेयस पारकर



प्रिया सुतार



अपूर्व खापरे



वेद कदोले



राजलक्ष्मी गुले



प्रियंका मुसळे



समीक्षा चाळके



शरण्या राक्षे



सुमेध मुंडे



समीर पवार


अवनी जावीर


अद्वीक पाटील


अद्वैय औसा


आर्या गील


आरोह कोकणे


कनिका इंगळे


विधिता इंगले


स्वरुप भताडे


निशांत विहुलेकर


प्रेम पाटील


प्रिया सुतार


पुनिता नलावडे


श्रेयल पवार


रुनाली येरुडकर


अर्नव लोखंडे


सक्षम




# गौताळा अभयारण्य

गौताळा अभयारण्यापासून औरंगाबाद हे सर्वात जवळचे विमानतळ आहे. औरंगाबाद आणि जळगाव ही सर्वात जवळची रेल्वे स्थानके आहेत. त्याचप्रमाणे हे अभयारण्य कन्नड, औरंगाबाद आणि चाळीसगावशी रस्तामार्गे जोडले असल्याने या शहरांवरुनही अभयारण्याला पोचता येते. गौताळा अभयारण्याने प्राचीन वारसा जपला आहे. प्रसिध्द गणितज्ज्ञ भास्कराचार्य यांची कुटी, पुरातन मंदिर, लेणी, केदारकुंड, महादेव मंदिर, सीता खोरे आदी विविध प्राचीन स्थळांनी पर्यटकांना भुरळ घातली आहे. त्यामुळे ही ठिकाणे पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी आहे. पर्यटकांना नेहमीच्या अभयारण्यातील पशुपक्षी व वनस्पती बरोबरच ही प्राचीन ठिकाणेही पाहता येतील. गौताळा अभयारण्य अनेक ऐतिहासिक आणि धार्मिक घटनांशी संबंधित आहे. अभयारण्यातील पाटणा देवीचे मंदिर प्रसिध्द असून विशेषतः नवरात्रात हजारो भाविक देवीचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. सध्या हे मंदिर







पुरातत्व खात्याच्या नियंत्रणाखाली आहे. येथील वन विभागाच्या विश्रांतीगृहात विद्यार्थ्यांना निवासाची सोय उपलब्ध करुन दिली आहे. औरंगाबाद-कन्नड रस्त्यावर सातमळा रांगेत बौध्द परंपरेचा वारसा सांगणारी पितळाखोर लेणी असून, ती लेणी खडकांमध्ये कोरलेली भारतातील सर्वात प्राचीन लेणी समजली जाते. ही लेणी उंचावर असल्याने पायऱ्या चढून त्यांच्यापर्यंत पोचावे लागते. अभयारण्याला भेट देणारे पर्यटक या लेण्यांनाही आवर्जुन भेट देतात. गौताळा अभयारण्य वन्यप्रेमीबरोबरच छायाचित्रकार व इतरांच्या दृष्टीनेही आदर्श आहे. या सर्वांबरोबरच शहरी जीवनातून काही काळ शांततेत घालविण्याची इच्छा असणाऱ्यांसाठीही हे अभयारण्य उपयुक्त आहे.

मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यातील हे अभयारण्य १९८६ मध्ये अस्तित्वात आले. औरंगाबाद शहरापासून ते ७२ किलोमीटर अंतरावर असून पश्चिम घाटातील अजंठा आणि सातमळा पर्वतरांगेत वसले आहे. गौताळा या गावाच्या नावावरुन अभयारण्याला हे नाव दिले आहे. अभयारण्यातील केदारकुंड, सीताखोरे पाहण्यासाठी पर्यटक उत्सुक असतात. अभयारण्यात प्राण्यांच्या ५४ आणि पक्षांच्या २३० प्रजाती आढळतात. विविध वनस्पतींबरोबरच पशुपक्षांनी समृध्द असलेल्या मराठवाड्यातील सर्वात मोठ्या अभयारण्याला एकदा तरी भेट नक्कीच द्यावी. हे अभयारण्य प्राचीन वारसा जपणारे आहे. जानेवारीपासून मार्चपर्यंत अभयारण्याला भेट देण्याचा काळ उत्तम आहे.





# हसा मुलांनो हसा

भिकारी : (दाराबाहेर उभं राहून) बाईसाहेब, गारिबाला काहीतरी खायला द्या.

ठमाकाकू : थांब, दोन मिनिट हं,.....आत्ता आणते.

भिकारी : अरे बापरे, ही बाई मॅगी आणते की काय ?.....पळा इथून.

मस्तराम माजोरे मुंबईत प्रथमच गेला होता. बसमधून प्रवास करताना प्रवाशांनी कंडक्टरकडे तिकीट मागायला सुरुवात केली. पहिल्याने खिशातून पैसे काढत सांगितले, 'मोहंमद अली', दुसऱ्याला तिकीट विचारताच त्याने 'सेंट जोसेफ' सांगत पैसे दिले. तिसऱ्या महिलेने महालक्ष्मी सांगत पैसे दिले. मस्तराम जवळ कंडक्टर येताच त्याने 'एक मस्तराम माजोरे' सांगत कंडक्टरच्या हातात पैसे टेकवले.

रस्त्यावर एक अपघात झाला होता व घटनास्थळी मोठी गर्दी जमली होती. हे पाहून चंदूला आत घुसावेसे वाटले, पण कोणी दाद देईना. तेव्हा त्याला एक युक्ति सुचली, अरे सरका, अपघातात जखमी झालेला माझ्या नात्यातला आहे. असे सांगू लागला. ते ऐकून जमलेल्या गर्दीत एक जण ओरडला, अरे सरका, जखमी झालेल्याचा नातलग आला आहे. सर्वांनी चंदूला वाट करुन दिली. चंदू लगबगीने पुढे येऊन पाहतो तो काय! एक गाढव गाडीची धडक लागल्याने बेशुध्द होऊन पडले होते.

छोटू : दादा, फ्रीजचं पाणी पिऊ नये, असं मोठी माणसं का बरं म्हणतात रे!

दादा : अरे, लाइटबील जास्त येतं ना, म्हणून!





बळवंतरावांनी नुकतीच एक मोटार घेतली. तिच्यात काहीतरी बिघाड झाल्यामुळे त्यांनी ती एका गॅरेजमध्ये नेली. दुरुस्तीचे काम करणाऱ्या मेकॅनिकने सारी तपासणी करुन त्यांना सांगितले, "साहेब, गाडीची बॅटरी निकामी झालीय. बदलावी लागेल."

बळवंतराव म्हणाले, "मग बदल की!"

"साहेब, एक्साईडची टाकू का?" मेकॅनिक

बळवंतराव : "नको, दोन्ही साईडच्या टाक की!"

बाळूकाकांकडे पाहुणे आले. उन्हामुळे उकडत असल्याने त्यांनी कोट काढून खुंटीला अडकवून ठेवला. गप्पा रंगात आल्या. एवढ्यात त्यांचं लक्ष आपल्या कोटाकडे गेलं.

पाहुणे : बाळासाहेब, माझ्या कोटाच्या खिशात खडे भरतोय तो तुमचा मुलगा आहे ना?

बाळू काका : छे हो! तो तर माझ्या भावाचा मुलगा आहे. तो बघा तुमच्या बुटात माती भरतोय ना, तो माझा मुलगा आहे.

पप्पूला पोलिसांनी अटक केली आणि त्याच्यावर खटला सुरु झाला.

वकील : तुम्ही पोलिसाच्या खिशात जळती काडी का टाकली?

पप्पू : साहेब, मग काय करु? त्यांनी मला सांगितलं होतं की जामीन हवा असेल तर खिसा गरम करावा लागेल.

संज्या : बंड्या, मला सांग उत्तरपत्रिकेत सर्वात अगोदर काय लिहू?

बंड्या : अरे त्यात काय... लिही की, या उत्तरपत्रिकेत लिहिलेली सर्व उत्तरे काल्पनिक आहेत. यांचा कोणत्याही पुस्तकाशी काहीही संबंध नाही आणि जर काही संबंध आढळून आलाच तर तो निव्वळ योगायोग समजावा.

# लिंगसमभाव पुरस्कर्त्या
# मधू चौगावकर

महिलांचे हक्क, अधिकार, त्यांची प्रगती याकडे लक्ष वेधून घेत समाजात अनेक पातळ्यांवर आजही संघर्ष सुरु आहे. महिलांवरील अन्यायनिवारणासाठी त्यांना आरक्षण, विशेष सवलती व प्राधान्य देण्याचे उपाय योजले जातात. स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह धरणाऱ्या मधु चौगावकर यांनी मात्र प्रचलित लढ्यापेक्षा वेगळ्या मार्गाची निवड केली. शिक्षकांसाठी जेन्डर इक्वालिटीचे (लिंग समभाव) धडे तयार करण्याबरोबरच पुरुषांच्याही भावनिक अडीअडचणींना प्राधान्य देत खऱ्या अर्थाने समानतेचा विचार त्या रुजवत आहेत.



जेंडर रिसर्चर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मधू मूळच्या ग्वाल्हेरच्या. घरापासून समाजापर्यंत अनेक ठिकाणी त्यांनी स्त्री-पुरुष भेदभावाचे प्रसंग पाहिले. या भेदभावाचे मूळ कारण शोधत असतानाच त्यांना गरज वाटली जेंडर (लिंग समभाव) या विषयाचा अभ्यास करण्याची. लखनऊ विद्यापीठातून विमेन स्टडीज् विषयामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर त्यांना या कामामध्ये विशेष रस वाटू लागला. या भेदभावाचे तोटे महिलांबरोबरच पुरुषांनाही झाल्याचे त्यांना या अभ्यासादरम्यान लक्षात आले. लग्नानंतर १९९० साली त्या नाशिकमध्ये स्थायिक झाल्या आणि जेंडर याच क्षेत्रात पूर्णवेळ काम करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. या समानतेची सुरुवात त्यांनी आपल्या घरापासून केली. मुलगी तीन वर्षांची होईपर्यंत मधूंनी केवळ तिची आणि घराची जबाबदारी उचलली. परंतु त्यानंतर तीन वर्षे त्या कामासाठी घराबाहेर पडल्या आणि यावेळी घरची पूर्णवेळ जबाबदारी उचलली त्यांचे पती अरविंद चित्तेवाले यांनी. सध्या देशभरात त्या याच विषयावर कौन्सिलर (समुपदेशक) म्हणून काम करतात. युनिसेफच्या जेंडर एम्पॉवरमेंटविषयीच्या कोअर कमिटीवर त्या आहेत. तसेच केंद्र सरकारतर्फे स्त्री-पुरुष समानतेबाबत शिक्षकांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचे मॉडेल त्या विकसित

(पान ३४ वर)



कथा

# सुखी होण्याची कला

भगवान बुद्धांच्या काळातली ही एक गोष्ट आहे. एका गावात महिपाल नावाचा एक तरुण राहत होता. तो अतिशय महत्वाकांक्षी आणि ज्ञान पिपासू होता. नवनवीन विद्या –कला शिकून घेण्याची त्याला ओढ होती. त्याने प्रत्येक गोष्ट आत्मसात केली होती. अगदी बांधकामापासून ते वाद्य वाजवणे असो किंवा चित्रकला – शिल्पकला अशा विविध कला असो, सर्वात तो पारंगत झाला होता.

त्याच्यासारखा हुशार, बुद्धिमान सर्व कलासंपन्न पंचक्रोशीत कोणीही नव्हता. त्यामुळे साहजिकच त्याला या गोष्टीचा खूप अभिमान वाटे.त्यामुळे त्याचा अहंकार वाढला.

एकदा त्या गावात भगवान बुद्धांचे आगमन झाले. भगवान बुद्धांची कीर्ती आणि लोकप्रियता पाहून तो बेचैन झाला. तो विचार करु लागला, की यांच्याकडे अशी कोणती कला आहे,ज्यामुळे हे एवढे लोकप्रिय आहेत?

भगवान बुध्दांकडे जाऊन त्याने

प्रत्यक्ष विचारणा केली, भगवन! तुमच्याकडे अशी कोणती कला आहे, ज्यामुळे सर्वत्र तुमची कीर्ती गायली जाते? आणखी अशा किती कला तुम्ही शिकला आहात? भगवान बुद्ध म्हणाले, तू जसा विविध कलेत पारंगत आहेस तशा माझ्याकडे कुठल्याही कला नाहीत. माझ्याकडे फक्त सुखी होण्याची कला आहे. युवक म्हणाला, मला शिकवाल ती कला? बुद्ध म्हणाले, होय, अवश्य शिकविन; पण त्यासाठी तुला मनावर नियंत्रण ठेवता आलं पाहिजे. स्थितप्रज्ञ होता आलं पाहिजे. तरुण म्हणाला, एवढंच ना, त्यात काय एवढं! हे मी सहज करु शकतो. भगवान बुद्ध मंद स्मित करत म्हणाले, कोणी स्तुती केली तरी हुरळून जायचं नाही आणि निंदा केली तरी दु:खी व्हायचं नाही. प्राप्तीची लालसा नको आणि काही हरवण्याचं भय नको. अशा स्थिर अवस्थेत राहण्याची कला येणं आवश्यक आहे.त्यासाठी आठ दिवस प्रयत्न कर मग मला येऊन भेट.

युवकाने आठ दिवस कसोशीने प्रयत्न केला; पण त्याला काही मन नियंत्रणात ठेवता आलं नाही.छोट्या छोट्या गोष्टींसाठी तो कधी अस्वस्थ होई तर कधी चिंतीत होई. तेव्हा त्याला कळून चुकलं की आपल्याला एवढ्या कला येत आहेत,पण त्याच्याने फक्त आपला अहंकार वाढला.चिंता आणि लालसा वाढल्या.जीवन सुखी होण्याऐवजी दु:खी झाले.खरी कला तर मनाला नियंत्रण ठेवणे हीच आहे. तेव्हाच जीवन सुखी होईल.

❖❖❖

# मधू चौगावकर

(पान ३२ वरुन)

करतात. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळवणुकीविरोधातील समितीवरही त्या काम करतात.

मुलगा-मुलगी हा भेद समजू लागलेल्या आठ-दहा वर्षांच्या मुलामुलींपासून ते विविध कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांपर्यंत त्यांचे जेंडर विषयावरील जनजागृतीचे काम असते. विविध प्रकारचे खेळ, प्रतिकृती, कार्यक्रम यांच्या माध्यमातून समाजाने स्त्री आणि पुरुषांचे अधिकार, जबाबदाऱ्या, कर्तव्ये यांच्यामध्ये कशाप्रकारे भेदभाव केला आहे, याबाबत जागृती करण्याचे काम त्यांनी शाळा, कॉलेज व कंपन्यांमध्ये राबविलेल्या शिबिरांमधून केले आहे. त्यामुळेच आज **मीना-राजू मंच** यासारखे उपक्रम शाळांमध्ये राबवून लिंग समभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. महिलांबरोबरच पुरुषांना येणाऱ्या समस्या, पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा, महिलांना मिळणारी दुय्यम भूमिका हे वास्तव समोर मांडून, समानतेसाठी कोणता प्रयत्न होणे गरजेचे आहे, यावर त्यांचे मार्गदर्शन असते.

महाराष्ट्राबरोबरच कर्नाटक, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार या राज्यांमध्येही त्यांचे काम पोहोचले आहे. केवळ महिलांपुरता मर्यादित विचार न करता त्यांनी पुरुषांनाही तितकेच बरोबरीचे स्थान या कामामध्ये दिले आहे.

(साभार)

# सण होळीचा

नेमेचि येतो सण होळीचा
होतो साजरा दर वर्षाला ।
लहान थोर घेती सहभाग
काय वर्णावे त्यांच्या हर्षाला ।

इतिहासाचा देऊन दाखला
दहन होलिकेचे करती ।
ढोल ताशे बडवित फिरती
उच्च रवाने बोंब मारती ।

आव भक्तीचा आणताना
भाव भक्तीचा बनला नाही ।
विरोध असत्याचा करताना
ग्राहक सत्याचा बनला नाही ।

लाखो झाडे जरी जाळली
मानव सद्‌गुणी बनला नाही ।
दुर्गुणरुपी होलिकेचा
मनोभाव अजून गेला नाही ।

प्रतीके आजवर जाळूनही
मर्म तयाचे कळले नाही ।
नाते सर्वव्यापी नारायणाशी
प्रल्हादासम जुळले नाही ।

अवगुणांची होळी करुनी
दैवी गुण धारण करू या ।
संकल्प करु भावभक्तीचा
हरिरंगी नित्य रंगून राहू या ।

– कैलास कुटे

प्रथम क्रमांक

# मोबाईल शाप की वरदान



आजचे युग हे माहिती–तंत्रज्ञानाचे युग आहे. अशा या वेगवान युगात मोबाईल खूपच स्मार्ट झाला आहे. की पॅडची जागा आता टच स्क्रीनने घेतली आहे. खूप सारी माहिती इंटरनेटच्याद्वारे मिळत असल्याने लहान–मोठी मुलं, स्त्री–पुरुष सर्वांच्या हातात मोबाइल पाहायला मिळतो. आजच्या निबंधाचा मुख्य आशय लक्षात घेता आपण प्रथम मोबाईल मानव जातीला शाप कसा ठरत आहे, ते पाहू या....

आज मोबाइलचे खूप सारे दुष्परिणाम लहान मुले आणि तरुणांवर जास्त होत आहेत.जास्त वेळ मोबाईल वापरणे, गेम्स खेळणे,सोशल मिडीयाचा अति वापर. यामुळे विध्यार्थांचे अभ्यासाचे कित्येक तास अक्षरश: वाया जात आहेत. परिणामी अभ्यासाचे नुकसान तर होतच आहे; पण लहान मुलांच्या डोळ्यांवर देखील वाईट परिणाम दिसून येत आहे. बालवर्गातल्या मुलांनाही चष्मा वापरावा लागत आहे. नोकरी धंदा करणारे जे तरुण आहेत त्यांनाही मोबाईल हॅक करणाऱ्या, डाटा चोरी करणाऱ्या टोळ्यांमुळे आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे. बँक बॅलेंस असुरक्षित झाले आहेत. मुले व पालक यांच्यातला सुसंवाद संपल्यात जमा आहे.परिणामी कुटुंब व्यवस्था बिघडली आहे.मोबाईलच्या अतिवापराने लोकांना त्याचे व्यसनच जडले आहे. परीस्थिती नसतानाही महागडे मोबाईल घेण्याचा मुले आग्रह करत आहेत.त्यामुळे मोबाईलच्या नावाने मोठी माणसे खडे फोडत आहेत...असो.

आता विषयाची दुसरी बाजू म्हणजे वरदान कोणते ते पाहू.... मोबाईलचा योग्य वापर केला तर तो एक वरदानच

ठरेल यात शंकाच नाही. ते एक एकमेकात संवाद साधण्याचे अत्यंत महत्वाचे साधन आहे. आधुनिक युगात मोबाईल ही चैनीची वस्तू नसून जीवनावश्यक वस्तू म्हणून महत्वाची भूमिका बजावत आहे. मोबाईलमध्ये असलेल्या ॲप्सच्या मदतीने बाजारात न जाता आपण ऑनलाईन खरेदी करु शकतो.पैसे पाठवण्यासाठी बँकेत जाण्याची गरज वाटत नाही. घरबसल्या पेमेंट करता येते. युटयुब वरुन मुलांना मनोरंजन तसेच शिक्षणासाठी उपयुक्त व्हीडीओ पाहता येतात. व्यावसाईक अपडेट घर बसल्या देऊ शकतात, पाहू शकतात. कोरोना काळात तर वर्क फ्रॉम होम ही, संकल्पना मोबाइल व इंटरनेट सारख्या माध्यमांमुळे साकारली गेली. व्हाटसअप मधून नातेवाईक व मित्रांशी संवाद साधला जातो, शुभेच्छा देऊन नाती जपणे सोपे झाले आहे. आता.. एकूणच तात्पर्य हेच आहे की, वस्तू खराब नसते तिचा उपयोग कसा केला जातो हे महत्वाचे आहे.म्हणून मोबईल शाप की वरदान हे वापरणाऱ्यावरच अवलंबून आहे एवढे मात्र नक्की!

कु.सात्विक शरद अबगुल
इयत्ता आठवी क. सेंट फ्रान्सिस
स्कूल, बोरिवली ( मुंबई)



स्वामी विवेकानंदांच्या जीवनातील प्रेरक प्रसंग

# नेहमी सावध राहावे

एकदा स्वामी विवेकानंदजी विदेशात असताना ट्रेन मधून प्रवास करत होते. त्यांच्यासभोवती काही मुली गोळा झाल्या. त्या स्वामींच्या भगव्या वस्त्रांची टिंगल टवाळी करू लागल्या. तरीही स्वामी शांतच होते.नंतर त्यांची नजर स्वामींच्या हातातील रत्नजडित घड्याळाकडे गेलं. ते घड्याळ त्यांना भारतातील एका महाराजांनी भेट म्हणून दिले होते. त्या मुली स्वामींकडे घड्याळाची मागणी करु लागल्या. स्वामी त्यांच्याकडे दुर्लक्ष करत होते. हे पाहून त्या मुली स्वामींना धमकावू लागल्या की जर घड्याळ दिले नाही तर तुम्ही आम्हा मुलींना छेडत आहात अशी तक्रार करु. स्वामींनी आता बहिरेपणाचे सोंग घेतले. ते खुणेनेच म्हणाले, की तुम्हाला काय म्हणायचे ते कागदावर लिहून द्या. मुलींनी घड्याळ द्या असे लिहून दिले. तो कागद घेत स्वामी त्या मुलींना म्हणाले, आता पोलीसांना बोलवा मला तुमच्या विरुद्ध तक्रार करायची आहे. हे ऐकताच मुली तिथून ताबडतोब पळून गेल्या.

स्वामीजींनी नेहमी सावध राहावे अशी केवळ शिकवण दिली नाही तर ते स्वतः नेहमी सावध राहात.

संग्राहक : सुकदेव पाटील

# किट्टी

चित्रांकन व लेखन :
अजय कालडा




रात्रीच्या वेळी
आईने रात्री जेवणात बटाट्याची भाजी, डाळ आणि चपात्या बनवल्या.
किट्टी हट्ट करायचा नाही, गुपचूप खाऊन घे.
आई, मला हे जेवण नकोय. मला तर बर्गर आणि कोल्ड ड्रिंक पाहिजे.
किट्टीने आईची नजर चुकवून ताटातील पदार्थ फुलांच्या कुंडीत टाकून दिले.
दुसऱ्या दिवशी
किट्टी, तू दूध पी.
नको, नको! मला दूध नाही आवडत.


आई आतमध्ये जाताच किट्टीने दूधाने भरलेला ग्लास खिडकीबाहेर फेकून दिला
आई मी शाळेत जाते, बाय!
सकाळी साफसफाई करताना आईला फुलांच्या कुंडीत रात्री टाकून दिलेल अन्नपदार्थ दिसले. हे नक्कीच किट्टीचं काम आहे हे आईने ओळखलं.


संध्याकाळी
किट्टी चल, आपण एक रोप लावू या.
हो आई, मी तुला मदत करते
आई कुंडीमध्ये कोल्ड ड्रिंक ओतू लागली.
आई, हे काय करतेस? कोल्ड ड्रिंकमुळे रोप मरुन जाईल. याच्यात पाणी टाक.
पण बेटा, तू तर खूप कोल्ड ड्रिंक पितेस. आणि बर्गर, पिझ्झाही खातेस. जर कोल्ड ड्रिंकने रोपाचं नुकसान होणार असेल तर तुझी तब्बेत देखील बिघडू शकते.
कळलं मला आई! आता मी फक्त घरचेच पदार्थ खात जाईन.

# संत दामाजीपंत



सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा हे एक तालुक्याचं ठिकाण आहे. तेथे पंधराव्या शतकात दामाजीपंत नावाचे थोर संत होऊन गेले. दामाजीपंत हे विठ्ठलाचे परमभक्त होते. त्यांचा जन्म एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. बिदर येथील मोहम्मद शहाच्या दरबारात ते सेनापती होते. त्यांनी युद्धात पराक्रम गाजवल्यामुळे बिदरच्या बादशहाने त्यांना खजिनदार हे पद देऊन मंगळवेढ्याच्या मामलेदार पदी नेमणूक केली.

एकदा महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. जनता अन्न पाण्यासाठी तडफडत होती. दामाजीपंतांना लोकांचे दु:ख पाहवले नाही. दुष्काळग्रस्त लोकांचा जीव वाचावा म्हणून त्यांनी शाही धान्याचे कोठार लोकांसाठी खुले केले.दामाजीपंतांनी बादशाहाला न विचारता लोकांना धान्याचे वाटप केले, ही गोष्ट बादशाहाला कळल्यावर त्याचा राग अनावर झाला. त्याने दामाजीपंतांना बंदी बनवून बिदरला आणण्यासाठी सैनिक पाठवले; परंतु दामाजीपंत निर्भय होते. प्राण गेला तरी चालेल,लोकांचा जीव वाचवणं महत्त्वाचं आहे असं त्यांना वाटत होतं. त्यांची पत्नी देखील तेवढीच धीराची होती. ती पंतांना म्हणाली, विठ्ठलाने तुम्हाला एकांत मिळावा आणि त्याचं ध्यान– स्मरण व्हावं म्हणून कदाचित सैनिकांना तुम्हाला बंदी करण्यासाठी पाठवलं आहे.

वाटेत पंढरपूर लागले. दामाजीपंतांनी विठ्ठलाच्या दर्शनाची इच्छा दर्शवली. तेव्हा सैनिकांनी त्यांना विठ्ठलाचं दर्शन घेण्याची अनुमती दिली. दामाजींनी आपली कैफियत विठ्ठलापुढे मांडली आणि त्यानंतर शिक्षा भोगायला निघाले.

दामाजीपंत बिदरला पोचण्याच्या आतच बिदरला बादशाहाच्या दरबारात एक काळा– सावळा तरुण आला.तो बादशाहाला कुर्निसात करून म्हणाला, माझ्या धन्याने जे धान्य गरिबांमध्ये वाटलं, त्याचं मोल घेऊन त्यांनी मला पाठवलं. त्याचा स्वीकार व्हावा आणि मला तशी पावती द्यावी. बादशाहाने त्याला नाव विचारले असता तो म्हणाला, मी धन्याचा सेवक विठू महार.बादशाहा त्या तरुणाकडे पाहतच राहिला. त्याच्यावरून नजर हटूच नये असे त्याला वाटत होते; परंतु तरुण थांबायला तयार नव्हता. धान्याचे

# अशी झाली कागदी नोटांची सुरुवात

आज आपल्याकडे एक रुपयापासून दोन हजार रुपयापर्यंतच्या कागदी नोटा आहेत. पूर्वीच्या काळी फक्त धातूंची नाणी चलनाच्या रुपात प्रचलित होती. आता कागदाच्या नोटांचा इतिहास पाहूया.

इंग्लंडमध्ये एक गरीब कुटुंब राहत होते. त्या कुटुंबातील एका मुलाचे नाव थॉमस होते. त्याच्या वडिलांनी त्याला एका छापखान्यामध्ये नोकरीला लावले. थॉमस छापखान्यामध्ये स्वच्छता करणे, पाणी भरुन ठेवणे इ. कामे करीत असे. काही काळानंतर तो कंपोझिंग आणि छपाईवर जास्त लक्ष देऊ लागला.

काही काळानंतर थॉमसच्या मालकाने त्याला प्रेसमधून काढून टाकले. थॉमसला खूप वाईट वाटले. त्याच्यावर घरातल्या अनेक जबाबदाऱ्या होत्या. त्यामुळे त्याने कचऱ्यातून वस्तू वेचून त्या विकायला सुरुवात केली.

एके दिवशी त्याची ओळख प्रसिध्द चित्रकार रिचर्डशी झाली. बोलता-बोलता थॉमसने रिचर्डला सांगितले, की मी एक हुशार प्रिंटर आहे. मला एक प्रिंटींग प्रेस उभी करायची आहे परंतु माझ्याकडे पुरेसा पैसा नाही. रिचर्डला त्याची दया आली. त्याचा नाव व पत्ता लिहून घेतल्यानंतर काही दिवसांनी त्याला बोलावून एक प्रस्ताव त्याच्यासमोर ठेवला. मला प्रिंटींग प्रेस सुरु करायची आहे. तुला काहीही मोबदला न देता माझा सहकारी म्हणून काम करशील का? थॉमस तयार झाला. त्याने प्रेस चालवायला सुरुवात केली. त्याला अनेक चांगली पुस्तके छापण्याच्या ऑडर्स मिळू लागल्या. त्याने छापलेल्या खेळण्याच्या पत्त्याला बरीच प्रसिध्दी मिळाली.

त्याने सरकारला मुद्रा म्हणून नाण्याऐवजी कागदी नोटा वापरायला सांगितल्या. या मुद्यावर बरेच वाद झाले आणि शेवटी थॉमसने सन १३६४ मध्ये नोटा छापल्या. अशाप्रकारे इंग्लंड या देशाने पहिली कागदाची नोट चलनात आणली.

❖❖❖

## संत दामाजीपंत

मोल मिळाल्याची पावती घेऊन तो त्वरित निघून गेला. बादशाहाने पुन्हा आदेश पाठवला, की दामाजीपंतांना सन्मानाने दरबारात घेऊन या.निरोप मिळताच सैनिकांनी त्यांच्या बेड्या काढल्या आणि त्यांना सन्मानाने दरबारात आणले. बादशाहाने त्यांना कडकडून मिठी मारली. धान्याचे मोल आपण विठू महारामार्फत पाठवले असल्याचे सांगितले. दामाजीपंत आश्चर्य व्यक्त करत म्हणाले, पांडुरंग स्वतः विठू महार बनून आपली सुटका करण्यासाठी आला! त्यांचं हृदय गदगद झालं.

पंतांची थोरवी पाहून बादशाह देखील त्यांच्या समोर नतमस्तक झाला.

❖❖❖



कथा

# विश्वास आणि धन्यवाद

एका जंगलात एक ऋषी राहत होते. ते जन्मापासूनच दृष्टिहीन होते. असे असूनही ते रोज सकाळी उंच पर्वतावर शिखरावर फेरफटका मारायला जात असत. एके दिवशी त्यांच्या एका शिष्याने त्यांना विचारले, गुरुदेव! आपण पाहू शकत नाहीत, तरीही या उंच पर्वत शिखरावर आपण एकटेच फिरायला का जाता? कुठेतरी आहे घसरून दरीत पडण्याची भीती तुम्हाला वाटत नाही का?...खरं तर देवाने तुमच्यावर खूपच अन्याय केलाय.त्यावर गुरुदेव एक शब्दही बोलले नाहीत.

दुसऱ्या दिवशी त्यांनी त्या शिष्याला सोबत घेतले आणि ते पर्वत शिखरावर फिरावयास निघाले. उंच शिखरावर पोचल्यानंतर ते शिष्याला म्हणाले, बाळ!

(पान ४६ वर)



# वटवृक्षाची शिकवण

राजू नववीत दुसऱ्यांदा नापास झाला होता. त्यामुळे त्याला सगळ्यांचेच बोलणे ऐकावे लागत होते. मित्रांचे चिडवणे, शिक्षकांचे ओरडणे आणि घरच्यांचे बोलणे या साऱ्या गोष्टींमुळे राजू वैतागून घर सोडून निघाला. रागाच्या भरात निघालेला राजू नेमका कुठे चालला आहे ते त्यालाच कळत नव्हते. चालता चालता घनदाट जंगलात केव्हा पोहचला हे त्याला कळलेच नाही. आता तो पार थकून गेला होता. मनातला रागही शांत झाला होता. त्याने एका घनदाट वटवृक्षाखाली विश्रांती घ्यायचं ठरवले. वटवृक्षाची सावली खूपच शीतल होती. सूर्याचे प्रखर ऊन हा वृक्ष कसा सहन करु शकतो याचा विचार करतच त्याला झोप लागली.

जेव्हा त्याचे डोळे उघडले तेव्हा आकाशात काळे ढग जमा झाले होते. काही वेळातच जोरदार

वारे वाहू लागले. राजूने चटकन तिथून निघून जावे असा विचार केला. तोच वटवृक्षाचा आवाज आला. राजू! थांब. थोड्या वेळातच भयंकर वादळ आणि पाऊस येणार आहे. ते थांबेपर्यंत तू माझ्या आश्रयालाच राहा.

काही वेळातच ढग गडगडू लागले. विजा चमकू लागल्या. पावसासोबतच मोठमोठ्या गाराही पडू लागल्या. त्या भयंकर वादळात अनेक झाडे मुळापासून उन्मूळनही पडली.

पण वटवृक्षाकडे पाहून असे वाटत होते, की तो अशा वादळी पावसाशी झुंजण्यासाठीच तयार झाला आहे. जेव्हा वादळ-पाऊस थांबला तेव्हा वटवृक्ष पूर्वीपेक्षाही आकर्षक आणि तेजस्वी दिसत होता. ते पाहून राजूने विचारले, हे वटवृक्षा तुझ्याकडे अशी कोणती जादूची शक्ती आहे जिच्यापुढे हे भयंकर वादळ आणि पाऊसही तुझे काहीही बिघडवू शकले नाहीत ?

वटवृक्ष म्हणाला, राजू, ही जादूची शक्ती नसून दृढतेची शक्ती आहे. कितीही संकटरुपी वादळे आली तरी मी ठामपणे त्यांना सामोरा जातो. तूही मेहनत कर, पुन्हा अभ्यास कर. इतरांचे बोलणे, टोमणे या गोष्टींनी न डगमगता, अपयशाने न खचता पुन्हा नव्याने, जोमाने भरपूर अभ्यास कर तुला नक्कीच यश मिळेल. राजूला वटवृक्षाकडून यशाचा मंत्र मिळाला. मनात दृढनिश्चय करुन राजू परतीच्या प्रवासाला निघाला.

❖❖❖

# विश्वास आणि धन्यवाद

(पान ४४ वरुन)

तुला इथून खाली खोल दरी दिसतेय का? शिष्य म्हणाला, होय गुरुदेव! ऋषी म्हणाले, आता इथून मला तू धक्का मारुन खाली पाड. शिष्य पटकन म्हणाला, नाही गुरुदेव! मी हे नाही करू शकत! तुम्ही तर माझे गुरु आहात. तुम्हालाच काय पण शत्रूलाही मी धक्का देऊ शकत नाही. त्यावर ऋषी क्रोधाने म्हणाले, मूर्ख मुला! शिष्य असूनही गुरुची अवज्ञा करतोस? तुला नरक भोगावा लागेल. तरीही शिष्य विनम्रपणे हात जोडत म्हणाला, गुरुदेव! मला नरक भोगावा लागला तरी चालेल; पण मी तुम्हाला धक्का देऊन या दरीत पडणार नाही. गुरुदेव हसत हसत म्हणाले, बाळ !तुझ्यासारखा सामान्य शिष्य मला पाडू शकत नाही. तर मग जो माझा पालनकर्ता आहे, तो मला कसं पडू देईल? ज्याने आजपर्यंत माझा सांभाळ केला, तो तर सदैव माझ्या सोबतच आहे.तो मला पडू देणार नाही हा माझा ठाम विश्वास आहे.ईश्वराने जरी मला दृष्टी दिली नसली तरी आजूबाजूच्या परिस्थितीचा अंदाज घेण्याची क्षमता इतरांपेक्षा अधिक दिलेली आहे. म्हणून मी कधीही ईश्वराला दोष देणार नाही. उलट ईश्वराचे आभारच मानेन. ईश्वराने माझ्या कुवतीपेक्षाही मला अधिक दिलेलं आहे.

ईश्वरावर नेहमी दृढ विश्वास असावा व ईश्वराने जे काही दिलेलं आहे त्याबद्दल धन्यवादच द्यावेत.

❖❖❖

# सामान्य ज्ञान



१) बुद्धिबळ या खेळाचा जन्म कोणत्या देशात झाला ?

अ) चीन  ब) भारत  क) इंग्लंड  ड) जपान

२) भारताचा दुसरा ताजमहाल असे कोणत्या वास्तूला म्हटले जाते?

अ) चारमिनार  ब) जंतर मंतर  क) लाल किल्ला  ड) बीबी का मकबरा

३) छोटा भारत कोणत्या देशाला म्हटलं आहे?

अ) बांगलादेश  ब) भूतान  क) नेपाळ  ड) फिजी

४) ऑस्कर पुरस्कार कोणत्या क्षेत्रासाठी दिला जातो ?

अ) साहित्य  ब) शिक्षण  क) चित्रपट  ड) चित्रकला

५) कोणत्या जीवाला तीन हृदय असतात?

अ) ऑक्टोपस  ब) डॉल्फिन  क) कासव  ड) शार्क

६) 'मराठा तितुका मेळवावा महाराष्ट्र धर्म वाढवावा' हे वाक्य कोणाचे आहे?

अ) लोकमान्य टिळक  ब) रामदास स्वामी  क) साने गुरुजी  ड) शिवाजी महाराज

७) पांढऱ्या हत्तींचा देश असे कोणत्या देशाला म्हटले जाते?

अ) मलेशिया  ब) थायलंड  क) ऑस्ट्रेलिया  ड) द. आफ्रिका

८) खालीलपैकी कोणती जोडी रामायणातील नाही?

अ) जनक–सुनयना  ब) रावण–मंदोदरी  क)मांडवी–श्रुतकीर्ती  ड) पंडू –कुंती

९) १० फेब्रुवारी १९९५ रोजी इंग्रजी भाषिक वार्षिक संत कुठे संपन्न झाला?

अ) चंदीगड  ब) दिल्ली  क) टोरंटो  ड) न्यू जर्सी

१०) परमात्म्याची ओळख करून घेणं का आवश्यक आहे?


अ) संपत्तीसाठी  ब) पापक्षालनासाठी

क) मोक्षप्राप्तीसाठी  ड) शतायुषी होण्यासाठी

उत्तरे इतरत्र

# गँजेस शार्क

गँजेस शार्क ही शार्क माशाची क्वचित आढळणारी जात आहे. हा गोड पाण्यात राहणारा मासा असून तो फक्त गंगा नदीत आढळतो म्हणून याला गँजेस शार्क असे नाव पडले आहे. हा आकाराने मोठा मासा आहे. ह्याचे तोंड लांबट असून समोरुन किंचित गोलाकार असते. चेहऱ्याच्या वरच्या बाजूला डोळे असून ते शरीराच्या प्रमाणात बारीक असतात. पाठीवरचा दुसरा पंख हा पहिल्या पंखापेक्षाही थोडा लहान असतो. ओटीपोटाकडचा शेवटचा पंख हा मोठा आणि पसरट असतो. छातीवरचा पंख हा मोठा आणि पसरट असतो. शेपटीची दोन्ही टोकं लांबट आणि मोठी असतात. याच्या शरीराचा रंग राखाडी ते ब्राऊन छटा असलेला असतो. त्यावर स्पष्ट दिसेल अशी नक्षी असते. हा मासा खूप मोठ्या प्रमाणात पूर्वेकडील आणि



उत्तर पूर्वेकडील भारतातील नद्यात आढळतो. हुबळी नदी, बंगालचा पश्चिम भाग, गंगा, ब्रह्मपुत्रा, महानदी, आसाम, बिहार, ओरिसा इत्यादी भागात हा मासा आढळतो. बंगाली लोकं याला बाघ-माच म्हणजे टायगर फिश म्हणून ओळखतात. नदीतील मध्यभाग ते पाण्याच्या तळापर्यंत त्यांचा वावर असतो. जन्माच्या वेळेस ५५ ते ६० सें. मी. लांबी असलेला हा मासा पूर्ण वाढ झाल्यावर २ मीटर पर्यंत वाढतो. मात्र त्याच्या खाण्यापिण्याच्या सवयींबद्दल अजून माहिती उपलब्ध नाही.

-संग्राहक : स्वप्निल ऱ्हाटवळ

# सुसाट टोनी राजा
## (Tawny Rajah)



फेब्रुवारी, मार्च महिना आला की, जंगलं सुनसान होऊन जातात; पण पावसाळ्यानंतरचा हाच काळ फुलपाखरं बघण्याचा सर्वोत्तम काळ असतो. या वेळेस आपल्याला 'चिखलपान' करताना अनेक फुलपाखरं दिसतात. या चिखलपान करणाऱ्या फुलपाखरांच्या जाती अणि त्यांची संख्या खरोखरच विस्मयकारक असते. सुकलेल्या जागेत वा ओलसर चिखलावर स्पॉट स्वॉर्डटेल, कॉमन गल, ईमीग्रंट, झेब्रा ब्लू, लाइन ब्लू, सेलर्स, प्लम जुडी, पेन्सी अशी अनेक फुलपाखरं आआपल्याला दिसतात. यातील एक वैशिष्ट्यपूर्ण फुलपाखराची प्रजात म्हणजे 'राजा'.

या प्रजातीतील 'ब्लॅक राजा' व 'टॉनी राजा' ही 'फुलपाखरं खूप आकर्षक आणि सुंदर दिसतात. यांच वैशिष्ट्य म्हणजे ही फुलपाखरं संपूर्ण वर्षात फक्त याच काळात दिसतात. एका जागी स्वस्थ न बसणारी ही फुलपाखरं भन्नाट वेगात सुसाट उडतानाच दिसतात. प्रचंड वेगाने उडणाऱ्या या फुलपाखरांचं छायाचित्रण करणं म्हणूनच अवघड असत.


या फुलपाखरांची आणखी एक खासियत म्हणजे ती केवळ चिखलाकडेच आकर्षित होत नाहीत, तर अतिपक्व फळं, दारू, प्राण्यांची विष्ठा किंवा मूत्र यांच्याकडेदेखील आकृष्ट होतात आणि फक्त याच वेळेस जमिनीवर उतरतात. इतर वेळी केवळ झाडावर उंच ठिकाणी उडतानाच ती दिसून येतात.

या फुलपाखरांतील 'टॉनी राजा' हे अतिशय देखणं व आकाराने मोठं असं फुलपाखरू आहे. या फुलपाखराच्या पंखाची वरची बाजू उठावदार व पिवळसर-भगव्या रंगाची असते. त्याच्या वरच्या पंखाच्या टोकांना जाड काळी किनार असते. मादी फुलपाखराच्या पंखावर काळ्या किनारीखाली एक पांढरा पट्टा असतो, ज्यामुळे पंखांच्या कडेला झालर असल्याप्रमाणे दिसते. पंखांची खालची बाजू निळसर- पिवळी असते व त्यावर चंदेरी झळाळी असते. पंखांवर बारीक तपकिरी-लालसर रेघांची नक्षी असते. तसंच पंखांच्या टोकाला छान उठावदार शेपट्यासुद्धा असतात. असं हे इतर फुलपाखरांपेक्षा न्यारं रुपडं असलेलं 'टॉनी राजा' फुलपाखरू त्याच्या आकर्षकतेमुळे जास्त लोकप्रिय आहे.

-संग्राहक अंकित जाधव

# रंग भरा





## सामान्यज्ञान उत्तरे

१. ब
२. ड
३. ड
४. क
५. अ
६. ब
७. ब
८. ड
९. ब
१०. क

## शब्दकोडे २९६

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ म | थु | २ रा | | ३ श्री | लं | ४ का |
| यु | | ५ ज | पा | न | | बू |
| रे | | स्था | | ६ ग | ज | ल |
| ७ श | ८ कु | नी | | र | | |
| | रु | | ९ सा | | १० रा | ११ म |
| १२ उ | प | १३ पं | त | १४ प्र | धा | न |
| प | | ध | | ण | | ग |
| १५ मा | थे | रा | न | | १६ पो | ट |

!! तू ही निरंकार !!

पूर्ण सद्गुरू निजभक्तांची सारी संकटे दूर करी ।
पूर्ण सद्गुरू निजभक्तांची सर्व सुखाने झोळी भरी ।
पूर्ण सद्गुरू निजभक्तांवर कृपा दृष्टी उपकार करी ।
पूर्ण सद्गुरू निजभक्तांवर आले संकट दूर करी ।
पूर्ण सद्गुरू भक्त जनांची पापे सारी नष्ट करी ।
पूर्ण सद्गुरू भक्त जनांचे दुःख तापही दूर करी ।



शंकरराव जाधव
संयोजक, वाई तालुका

# महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

## THE COMPLETE FAMILY SHOWROOM

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

ऐ मन मेरे सुमिरण कर ले सुमिरण से सुख आयेगा । घेरेंगे न संकट तुझ को भवसागर तर जायेगा ।
दम दम पल छिन नाम का जो जन करता अमृत पान है । ऐसे जन को जग में सन्तो मिलता जीवन दान है ।

गुरू का जो यशगान करेगा यश दुनिया में पायेगा।
उसकी भी महिमा होगी जो गुरू की महिमा गायेगा।
गुरू की जैं जैं जो करता हैं उसकी होती जैं जैं कार।
गुरू की पूजा जो करता हैं उसको पूजे कुल संसार।

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2022-2024
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2022-24
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

